प-११

परिशिष्ठ - ब

# हमीपत्र तथा क्षतीपूर्तीबंधपत्र

(१) मी/आम्ही,............................................ वय ...........वर्षे, याद्वारे येथे गंभीर प्रतिपादन करतो की मी/आम्ही ................................ या नोंदणीकृत / अनोंदणीकृत मंडळाचा अध्यक्ष / सचिव/ अधिकृत स्वाक्षरीकर्ता असून त्याचा नोंदणी क्रमांक ............ आहे.

(२) मी / आम्ही असे प्रतिपादन करतो की, मी / आम्ही ........................ उत्सवाकरीता ........................... या ठिकाणी मंडप परवानगीसाठी अर्ज केला आहे.

(३) मी / आम्ही असे ही प्रतिपादन करतो की मी / आम्ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पोर्टलवरील मुंबई अग्निशमन दलाकडून प्रसृत केलेल्या सांकेतिकित (codified) अग्नि सुरक्षा आवश्यकतांचा अभ्यास केला आहे. मी आम्ही अशी हमी देतो की उपरोक्त सर्व अग्नि सुरक्षा आवश्यकतांचे उपरोक्त उत्सवादरम्यान आम्ही पूर्णपणे पालन करु. तसेच मी/आम्ही जिच्याद्वारे आग लागेल अथवा आरोग्यास अपाय होईल अशी कोणतीही कृती करणार नाही

(४) मी / आम्ही अशी हमी देतो की, मी / आम्ही मंडपामध्ये विद्युत उपकरणे अथवा संसाधने बसविताना ती मान्यताप्राप्त विद्युत निरीक्षक यांच्या निगराणीखाली इलेक्ट्रिसिटी अॅक्ट, २००३ च्या तरतुदीनुसार बसवून घेऊ .

(५) मी आम्ही / अशी हमी देतो की, महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अॅण्ड लाइफ सेफ्टी मेजर्स अॅक्ट २००६ च्या कलम ३) ३ (तसेच, महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अॅण्ड लाइफ सेफ्टी मेजर्स नियम २००९ च्या नियम क्र.४) १आणि नियम ( क्र.१) २ (मधील सर्व अग्नि सुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करु व ही सर्व अग्नि सुरक्षा उपकरणे सुस्थितीत ठेवू.

(६) मला / आम्हाला याची जाणीव आहे की, मी / आम्ही महाराष्ट्र फायर प्रिव्हेंशन अॅण्ड लाइफ सेफ्टी मेजर्स अॅक्ट, २००६ नुसार निर्धारित केलेल्या अग्नि सुरक्षा आवश्यकता तसेच मुंबई अग्निशमन दलाने निश्चित केलेल्या सांकेतिकित (codified) अग्नि सुरक्षा आवश्यकतांचे तसेच सक्षम प्राधिका-यांच्या निर्देशांचे पालन न केल्याचे आढळल्यास

अथवा सदर मंडपांच्या परवानगी व्यतिरिक्त तात्पुरते किंवा पक्के बांधकाम केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उपरोक्त परवानगी रद्द करण्यात येईल.

(७) मी / आम्ही मला / आम्हास ही परवानगी दिल्यामुळे महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका, त्यांचे अधिकारी, सेवक व अभिकर्ता यांना ; त्यांच्या विरोधात करण्यात येणारी कोणतीही कारवाई, नुकसानभरपाई, मागणी, दावे, इ. पासून या क्षतीपूर्तीबंधपत्राद्वारे बंधमुक्त करीत आहोत. उपरोक्त बाबी उद्भवल्यास त्यास सर्वस्वी मी / आम्ही जबाबदार असल्याचे याद्वारे मान्य करीत आहोत व त्याची सर्व जबाबदारी स्वेच्छेने घेत आहोत.

(८) मी / आम्ही या द्वारे प्रतिपादन करतो की, मी वर व मंडप परवानगी अर्जामध्ये दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे संपूर्णतः खरी असून ती चुकीची आढळल्यास माझ्यावर दिवाणी अथवा फौजदारी कारवाईस मी / आम्ही पात्र असेन याची मला / आम्हास जाणीव आहे व मला / आम्हास ते मान्य आहे.

(९) मी / आम्ही या द्वारे प्रतिपादन करतो व हमी देतो की सदर हमीपत्र हे उपरोक्त मंडळाचे अध्यक्ष, सचिव, सर्व कार्यकारिणी सदस्य व इतर प्राधिकृत व्यक्तींवर बंधनकारक राहिल.

मी / आम्ही ------------------------ असे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की उपरोक्त माहिती ही माझ्या माहितीप्रमाणे खरी व अचूक असून ती मी स्वतः पडताळली आहे.

अर्जदाराचे नाव व सही

मंडळाच्या सचिवांचे नाव व सही

मंडळाच्या अध्यक्षांचे नाव व सही